“नाशिक जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व आणि कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी”

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेल्या शोधप्रबंधाची

सारांश पत्रिका

(Final Abstract)

संशोधक

प्रल्हाद दत्तात्रय दुधाने

सहा.प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग,
क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे,
कला व वाणिज्य महाविद्यालय, दिंडोरी. जि. नाशिक.

मार्गदर्शक

डॉ. श्रीराम निकम

राज्यशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

जुलै- २०१३

प्रस्तावना (Introduction)

भारतात अनेक राज्यकर्ते आले आणि गेले. त्यात ब्रिटिश जास्त काळ टिकले. त्यांच्या भांडवलशाही धोरणामुळे जंगल तोडीचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. जंगल हे आदिवासींचे जगण्याचे साधन असल्याने आदिवासींनी ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध बंड केले. भारताच्या विविध राज्याबरोबरच महाराष्ट्राच्या आणि नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचाही त्यात मोठ्या प्रमाणात सहभाग होता. आज महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्याकडे शेतीच्या बाबतीत एक विकसित जिल्हा म्हणून पाहिले जात असले, तरी या जिल्ह्यातील इगतपूरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, दिंडोरी, सुरगाणा, कळवण, सटाणा, सिन्नर, येवला या भागातील अनुसूचित जमाती मात्र मागासलेल्याच आहेत. काही जमाती विकासाच्या प्रक्रियेत आलेल्या आहेत त्यात महादेव कोळी, कोकणा यांचा समावेश होतो असे असले तरी या भागातील अनुसूचित जमातीमध्ये आजही भगत बाबाला बऱ्यापैकी मान आहे. ग्रामीण भागातून डॉक्टरांपेक्षा भगतबाबाला लोक मानतात. खारा भगत, गोड्या भगत असे त्याचे प्रकार आहेत त्यामुळे त्यांचे नैवद्यही तसेच आहेत. नवस फेडण्यासाठी ठाकर जमातीमध्ये माणसाचा आजही जीव दिल्याचे आढळते. तसेच मुलाला शर्ट न घालण्याचा नवस कोकणा जमातीमध्ये आजही डोंगऱ्या देवाला केला जातो. अशा अनुसूचित जमातीमध्ये अनेक अंधश्रद्धा आहेत. वाघ, साप,पर्वत, चंद्र, सूर्य, वेताळ, आसरा, खंडेराय यांची ते पूजा करतात. त्याचबरोबर हिन्दूंचे सणही साजरे करतात. त्यामुळे त्यांच्यावर पारंपरिक विचारांचा प्रभाव जास्त असल्यामुळे ते आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत. बऱ्याच आदिवासींना लग्न करण्याइतपतही पैसे नसतात, तेव्हा पेन (साखरपुडा) करुन वैवाहीक जीवन जगण्याची अनुसूचित जमातीमध्ये मान्यता दिली जाते पैसे आल्यानंतर लग्न केले जाते, आदिवासींचे मजुरी करण्याचे प्रमाण जास्त आहे. पण मजुरी गावात मिळत नसल्याने गाव सोडून द्राक्षबाग, ऊसतोड, बिल्डिंग, बिगारी कामासाठी सहा ते आठ महिने गाव सोडावे लागते. आदिवासींच्या विकासासाठी राज्यघटनेच्या ४६ व्या कलमात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच कलम ३३० व ३३२ केंद्रीय व राज्य विधीमंडळात आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाली. आदिवासींच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभाग, शबरी वित्त व विकास महामंडळ राज्य आदिवासी सहकारी विकास महामंडळ आणि त्याचबरोबर जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्याकडूनही आदिवासींसाठी विविध योजना राबविल्या जातात. आदिवासी राजकीय नेतृत्त्व २४३ (घ)(१) ख नूसार ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेमधून आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी कार्यरत आहे. वरिष्ठ पातळीवर विधानसभा, लोकसभेचे आदिवासी नेते कार्यरत आहेत. राज्य आदिवासी विकास विभाग व आदिवासी विकास मंत्री कार्यरत आहेत पण तरीही ते अपयशी ठरले आहेत. त्यांच्या अपयशाची नेमकी काय कारणे आहेत. हे शोधण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व आणि त्यांच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी याचा अभ्यास होणे अत्यावश्यक आहे.

अभ्यास विषयाची मांडणी (Formution of Problem):-

भारतात ५८१ आदिवासी जमाती आहेत. त्यापैकी महाराष्ट्रात ४७ अनुसूचित जमाती आहेत. २००१ च्या जणगनणेनुसार महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या ८५,७७,२७६ इतकी असून नाशिक जिल्ह्यातील आदिवासींची लोकसंख्या ११,९४,२७१ इतकी आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने भिल्ल, महादेव कोळी, कोकणा, काथोडी किंवा कातकरी, कोळी ढोर, पारधी, ठाकूर किंवा ठाकर, वारली, बरडा, पटेलिया इत्यादी जमाती जिल्ह्याच्या इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, दिंडोरी, सुरगाणा, कळवण, सटाणा या तालुक्याच्या डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात तर जिल्ह्याच्या इतर तालुक्यात व भागात कमी प्रमाणात दिसून येतात. आदिवासी जमातींना अनेक नावांनी ओळखले जाते. हिस्ले, रॉक्सी, एल्व्हीन इत्यादी विचारवंतांनी त्यांना अगदी प्राचीन किंवा मूळ रहिवाशी असे संबोधले. तर गिलीन व गिलिन यांच्यामते, "एका विशिष्ट भू-प्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटांच्या समुच्चयाला 'आदिवासी समाज' असे म्हटले आहे. आर्य जेव्हा भारतात आले त्यावेळी भिल्ल हत्तीवर बसून त्याकाळी सत्ता मिळविण्यासाठी आलेल्या परप्रांतीय सत्ताधाऱ्यांशी संघर्ष, युद्ध करीत होते. आर्यांना विरोध करणाऱ्या समुहामध्ये भिल्ल प्रमुख होते. तरी सुद्धा त्यांची हार झाली. 1857 मध्ये ब्रिटिशांनी भारताला लुटण्याची जलद गतीने सुरुवात केली. कच्च्या मालाची भारतातून निर्यात वाढवून यंत्रोत्पादित पक्का माल भारताच्या बाजारपेठेत आणला जाऊ लागला. शेतीचे आणि जंगलाचे उत्पादन कच्चा माल म्हणून गोळा करण्यासाठी सावकार व्यापाऱ्यांनी आदिवासी भागात येऊन कमी किमतीत जमिनी ताब्यात घेतल्या. सावकारशाहीचे प्रस्थ वाढले. कारण शेतसारा भरण्यासाठी आदिवासींना सावकारांकडून कर्ज घ्यावे लागत होते. कर्ज न फिटल्यामुळे सावकार जमिनी घेत होते. अशाप्रकारे ब्रिटीश सरकार आणि सावकारही आदिवासींना लुटत होते. त्यामुळे होन्या केंगले यांनी महादेव कोळींचे संघटन करुन पुणे, ठाणे, रायगड जिल्ह्यात सावकारांवर चांगलाच वचक बसवला, त्यांना लुटले. ब्रिटिशांनी सावकारांना सुरक्षा पुरविली आणि होन्या केंगले आणि त्यांच्या साथीदारांना नांदगाव (रायगड) येथे पकडून फाशी देण्यात आली. म्हणून भागोजी नाईकाने नाशिक, अहमदनगर जिल्ह्यातील भिल्लांना एकत्र करुन इंग्रजांचे खजिने, फौजफाट्याचे नुकसान करणे, जमिनी आणि वतनदाऱ्यावरील हक्क प्रस्थापित करणे यावर लक्ष केंद्रित केले. भागोजीचे हे कार्य पाहून निझामानेही भागोजीला मदत देवू केली होती. पण ही मदत वेळवर पोहोचली नाही. 1859 मध्ये 'उमेद वसावा' याने सातपुड्यात ब्रिटिशांना सळो की, पळो केले, म्हणून ब्रिटिश अधिकारी बील ऑगबाय यांनी वाटाघाटी करुन स्थानिक भिल्लांना जमिनी वाटून दिल्या. जंगल उत्पादनावरील स्थानिक भिल्लांचे हक्क मान्य करण्यात

आले. भिल्लांच्या लढावू शक्तीचा फायदा करुन घेण्यासाठी कॅ. आट्राम यांनी 1831 साली खानदेश भिल्ल फलटणीची स्थापना केली ही फलटण 60 वर्षे चालली. 1891 साली फलटनीचे रुपांतर पोलिस दलात केले. 1857 मध्ये अनेक भिल्ल जवानांनी तात्या टोपे यांना स्वातंत्र्य लढ्यात मदत केली. 1857 च्या स्वातंत्र्य युद्धात अनेक आदिवासींनी नेतृत्व केले. नाशिक जिल्ह्यातील पेठ येथील 1857 चा उठाव देशभर गाजला. ठाणे येथे अकरा जणांना फाशी झाली. यात आदिवासींचे प्रमाण जास्त होते. पुढेही देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात आदिवासी आणि त्यांच्या नेतृत्वाने असेच अनेक उठावात कार्य केले. आणि देश स्वतंत्र होण्यास मदत झाली. स्वातंत्र्योत्तर काळात इतर समाजाचा व त्यांच्या नेत्यांचा विकास झाला, परंतु आदिवासी आणि त्यांचे नेतृत्व मात्र मागेच राहिले. म्हणून नाशिक जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व आणि त्यांच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

आदिवासी राजकीय नेतृत्व राज्यघटनेतील आरक्षणामुळे अस्तित्वात आलेले दिसून येते. आदिवासी राजकीय नेतृत्वाचे उच्च शिक्षण मोठ्या प्रमाणात झालेले नाही. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणच काही प्रमाणात झालेले आहे. त्यामुळे त्यांचा राजकारणात प्रभाव पडत नाही. राजकीय वारसा राजकीय समाजीकरण चांगल्या प्रकारे झालेले नाही. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेत आदिवासींसाठी राखीव जागा आहेत. त्या जागेवर ते निवडूनही येतात. परंतु प्रस्थापित तत्कालीन सत्ताधारी राजकीय नेतृत्वाच्या सल्ल्यानुसारच त्यांना कार्य करावे लागते. त्यामुळे त्यांना आपल्या प्रश्नांचे समस्यांचे राजकारण करता येत नाही. 78.1 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व आदिवासींच्या अडीअडचणीला धावून जात नाही. 81.3 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्वाला आदिवासींच्या प्रश्नाविषयी तळमळ असल्याचे दिसून येत नाही. म्हणून याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

आदिवासींना शासकीय योजनांचा पाहिजे त्या प्रमाणात लाभ मिळत नाही असे दिसून येते. 76 टक्के आदिवासींना आतापर्यंत एकाही योजनेचा लाभ मिळालेला नाही. तर 2011-12 च्या आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प नाशिक यांच्या योजना अंमलबजावणीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की आदिवासींसाठी अनेक विकासाच्या योजना राबविल्या गेल्या, त्यामध्ये दुभत्या जनावरांचे वाटप, गॅस युनिट पुरविणे, शासकीय पोस्ट बेसिक आश्रम शाळेत व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करणे, विकलांग आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व निर्वाह भत्ता देणे, ग्रेड तीन व चार कुपोषित बालकांना उपचार सुरु असताना पालकांना द्यावयाची बुडीत मजुरी यासारख्या इतर काही योजनांसाठी या विभागाकडून आर्थिक तरतूद केली गेली. परंतु प्रत्यक्षात या योजनेवर खर्चच केलेला नाही. याच वित्तीय वर्षात शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडूनही पुरेशा व्यवस्थित योजना राबविण्यात आलेल्या नाहीत. पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्या अंतर्गत आदिवासींसाठी काही योजना राबविल्या जातात

याचाही आढावा घेतला असता काही योजनांना आर्थिक तरतूदच नाही. तर काहींना आर्थिक तरतूद असून खर्च केलेला नाही. त्यामुळे याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

आदिवासी समाजामध्ये राजकीय उदासिनता मोठ्या प्रमाणात दिसून येते. अनुसूचित जमातीमध्येही प्रत्येक जमातीनुसार राजकीय संघटन होत असतांना दिसत आहे. त्यामध्ये महादेव कोळी, कोकणा, ठाकर, भिल्ल इत्यादींचे नाशिक जिल्ह्यामध्ये राजकीय संघटन आहे. अशा संघटनांमध्ये 67.7 टक्के आदिवासी समाज कार्य करत नाही. त्यामुळे त्यांचे राजकीय समाजीकरण झालेले नाही. पर्यायाने त्यांना आपले प्रश्न समस्या यांचे राजकारण करता येत नाही.

आदिवासींच्या मुला-मुलींचे अर्धवट शाळा सोडण्याचे प्रमाण जास्त आहे. हे तर खरे आहेच पण त्याहीपेक्षा हा समाज शंभर टक्के मागासलेला आहे. आदिवासींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढण्यासाठी 82.2 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व प्रयत्न करते. आपल्या मुलामुलींना ते शंभर टक्के शाळेत पाठवतात. पण उच्च शिक्षणापर्यंत 1.8 टक्केच विद्यार्थी पोहचतात असे का होते याचा अभ्यास झालेला नाही.

आदिवासी समाजामध्ये मोठ्या प्रमाणात रुढी पंरपरा असल्याचे दिसून येते. प्रत्येक अनुसूचित जमातीमध्ये जात पंचायत आहे. या जात पंचायतीमध्ये विवाहित तरुणीचा विनयभंग करणे, शेतीवरुन आपसात झालेले वाद, विवाह संबंध बिघडले असता घटस्फोट घेणे यासारख्या इतर कारणावरुन जातपंचायत भरविली जाते. तसेच होळी पारंपारिक पद्धतीने साजरी करणे, फाग मागणे, पेन करणे, डोंगऱ्या देवाला नवस करणे, ठाकर जमातीमध्ये नवस फेडण्यासाठी व्यक्तीचा बळी देण्याची घटना आजही घडत असल्याचे दिसून येते. अशा या रुढी प्रथा आजही आदिवासींमध्ये होताना दिसतात म्हणून त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

अनुसूचित जमातीमध्ये व्यसनाधिनता जास्त आहे असे दिसते. तंबाखू खाणे, बिड्या पिणे, दारु पिणे, याचे प्रमाण जास्त दिसते. बाळंतपणात सुईन म्हणून काम करणाऱ्या स्त्रीला भिल्ल जमातीमध्ये दारुची बाटली दिली जाते, तसेच आदिवासींच्या एकाच घरात दोन चार लोकांचे निधन झाले तर सर्वांचा एकच श्राद्ध विधी केला जातो. अशा प्रसंगी सर्वांना प्रथेप्रमाणे दारु दिली जाते. तसेच "गांडी दिवाळी" प्रथेप्रमाणे सर्व पाहुण्यांना मटन आणि दारुची सोय केलेली असते. याचा अभ्यास कुणी केलेला नाही.

अनुसूचित जमातीमध्ये अल्प भू-धारकांचे प्रमाण अधिक असून त्यांच्या जमिनी कोरडवाहू आहेत. बरेच आदिवासी भूमीहीनही आहेत. अभ्यासाअंती असे दिसून आले की, 32.3 टक्के आदिवासी शेती करतात आणि त्यांची शेती वडीलोपार्जित आहे. 32.3 टक्के आदिवासींकडे जी जमीन आहे त्यापैकी दोन एकरपर्यंत बागायती

जमीन असणाऱ्यांचे प्रमाण 12.9 टक्के आहे. तर 4 ते 6 एकर असलेल्यांचे प्रमाण 6.5 टक्के आहे. तसेच 20 टक्के लोकांकडे पडीक जमीन आहे. याचा अभ्यास कुणी केलेला नाही. मूळ रहिवासी यांना अशी वेळ का आली याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

आदिवासींच्या जमिनी उच्च वर्णियांनी बळकावलेल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात भांडवलशाही ब्रिटिशांनी कच्चा माल इंग्लंडमध्ये निर्यात करण्यासाठी आदिवासींचे जंगलावर आक्रमण केले, जंगलतोड केली. त्यानंतर ब्रिटिशांनी शेतसारा पैशाच्या स्वरुपात वसूल करण्यास सुरुवात केली. आदिवासी सावकारांकडून कर्ज घेऊन शेतसारा भरु लागले. कर्ज लवकर फिटेनासे झाले की, सावकार आदिवासींच्या जमिनी घेत असत. तसेच 1889 मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला या दुष्काळात आदिवासींचे मोठ्या प्रमाणात हाल झाले, उपासमार झाली, मामुली किमतीला आदिवासींनी आपल्या जमिनी सावकारांकडे गहाण ठेवल्या. काही आदिवासींनी सावकार जमीनदारांना कमी किमतीला विकल्या. प्रत्यक्ष कष्ट करणारे आदिवासी आणि उत्पादन घेऊन जाणारे सावकार व जमीनदार असा नवा वर्ग अस्तित्वात आला. आणि शेवटी व्यापारी व सावकार जमीनदार झाले.

थोडक्यात नाशिक जिल्ह्यातील विविध आदिवासी जमाती, त्यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा एकूणच सर्वांगीण विकासासाठी स्वातंत्र्यानंतर केंद्र व राज्य सरकारकडून विविध योजनांच्या माध्यमातून करण्यात आलेले प्रयत्न आणि त्यांचे यशापयश, आदिवासींचे राजकीय नेतृत्व आणि वास्तव, आदिवासींच्या चालीरिती आणि परंपरा, शिक्षण आणि ब्रिटिश काळापासून आजपर्यंत राजकीय सत्ताधाऱ्यांचा या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा राहत आला आहे? याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तूत ठिकाणी करण्यात आला आहे. तसेच स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेमध्ये आदिवासींचे हितसंबंध जपण्यासाठी त्यांना पुरेसे संरक्षण देण्यासाठी आणि त्यांचे भौतिक जीवनमान उंचावण्यासाठी जंगल व जमीनविषयक कायदे करण्यात आलेले आहेत. त्याचा थोडा फार फरक पडलेला आहे. आदिवासींच्या जमिनी आता बिगर आदिवासींना घेता येत नाहीत. तरीही आदिवासी आजही भूमीहीन मोठ्या प्रमाणात आहेत. याची सविस्तर माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

गृहितके (Hypothesis):

वरील चर्चेला अनुसरुन आपल्याला काही गृहितके बांधता येतात, ती खालील प्रमाणे.

1) आदिवासींना सक्षम नेतृत्व नाही.
2) आदिवासींना शासकीय योजनांचा पाहिजे त्या प्रमाणात लाभ मिळत नाही.
3) आदिवासींमध्ये राजकीय उदासिनता दिसून येते.
4) आदिवासींच्या मुला-मुलींचे अर्धवट शाळा सोडण्याचे प्रमाण जास्त आहे.

5) आदिवासींमध्ये रुढी-प्रथांचा स्वीकार मोठ्या प्रमाणात केला जातो.

6) आदिवासींमध्ये व्यसनाधिनता जास्त आहे.

7) अल्प भू-धारकांचे प्रमाण अधिक असून कोरडवाहू जास्त आहेत.

8) आदिवासींच्या जमिनी उच्चवर्णियांनी बळकावल्या आहेत.

संशोधनाचा उद्देश (Objectives) :

1) आदिवासींसाठीच्या शासकीय योजनांचा कितपत लाभ झाला याचा अभ्यास करणे.

2) आदिवासींमधील राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करणे.

3) आदिवासींच्या कौटुंबिक व आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे.

4) आदिवासींमधील सामाजिक, राजकीय परिवर्तनाचा अभ्यास करणे.

5) आदिवासींची शैक्षणिक स्थिती अभ्यासणे.

6) आदिवासींच्या उदरनिर्वाहाच्या साधनांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती (Research Methodology) :

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक अनुभववादी विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून या विषयाचा अभ्यास करताना प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

प्राथमिक स्त्रोतामध्ये मुलाखत अनुसूची, शासनाचे प्रकाशित, अप्रकाशित अहवाल गॅझिटिअर, जनगणना व अनुसूचित जमातींचे जनगणना अहवाल पाहणी, मुलाखत औपचारिक, अनौपचारिक चर्चा यांचा आधार घेण्यात आला आहे.

दुय्यम साधनांमध्ये सर्व प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्य, विविध मासिके, पाक्षिके, शोधनिबंध, संशोधनपर लेख, वृत्तपत्रातील लेख, इत्यादींच्या माध्यमातून अधिकाधिक माहिती संकलन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

नमुना निवड पद्धत (Types of Sampling):

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व आणि आदिवासींच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी या संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी संशोधनाच्या प्राथमिक साधनांची निवड करताना समग्रांचा

विस्तार लक्षात घेऊन गैर-संभाव्यता नमुना निवड पद्धती अंतर्गत सोयीस्कर किंवा सुविधाजनक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. या पद्धतीने नमुन्याची निवड करताना नाशिक जिल्ह्यातील सर्वच 15 तालुक्यांची निवड न करता जिल्ह्यातील इगतपूरी, त्र्यंबक, पेठ, दिंडोरी, कळवण, सुरगाणा व सटाणा या आदिवासी बहूल तालुक्यांची निवड करण्यात आली. या तालुक्यातील आदिवासींसाठी राखीव असलेला जिल्हा परिषदेचा गट आणि त्याच गटातील आदिवासींसाठी राखीव असलेला पंचायत समितीच्या गणातील किंवा जिल्हा परिषदेच्या खुल्या गटातील आदिवासींसाठी राखीव असलेल्या गणातील एका ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित आदिवासी ग्रामपंचायत सदस्य यांची निवड करण्यात आली. असे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत मिळून 56 सदस्य आणि त्याच आठ गावातील प्रत्येकी बारा नागरीकांची निवड करुन मुलाखत अनुसूची भरुन घेण्यात आल्या

प्रबंध लेखनाचा आराखडा (Design of Thesis):

प्रस्तुत प्रकरणाची सहा प्रकरणात विभागणी करण्यात आलेली असून त्याचा संक्षिप्त सारांश खालील प्रमाणे सांगता येईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन आराखडा

प्रस्तावनेच्या पहिल्या प्रकरणामध्ये आदिवासींच्या विकासासाठी महाराष्ट्र शासन आणि भारत सरकार आपल्या विविध प्रशासकीय कार्यालयामार्फत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात. आदिवासींच्या विकासविषयक तरतूदी भारतीय राज्य घटनेत केल्याची माहिती ही या प्रकरणात दिली आहे. तसेच आदिवासी म्हणजे काय, भारतात किती आदिवासी जमाती असून महाराष्ट्रात त्यातील किती आदिवासी जमाती आहेत. त्यातील कोणत्या जमाती नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, दिंडोरी, सुरगाणा, कळवण, सटाणा या तालुक्याच्या डोंगराळ भागात राहतात याची माहिती या भागात देण्यात आलेली आहे. तसेच भौगोलिक परिस्थितीही थोडक्यात स्पष्ट केलेली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात म्हणून याच आदिवासी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदेतील आदिवासी गट आणि गणातील 56 राजकीय नेतृत्वाच्या मुलाखत अनुसूची भरुन घेण्यात आलेल्या आहेत. तसेच याच गण आणि गटातील आदिवासी भागातील आदिवासी नागरीकांच्या आठ गावातील 96 मुलाखत अनुसूची भरुन घेण्यात आलेल्या आहेत. त्यातून नाशिक जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व आणि आदिवासी नागरीक यांच्या मुलाखत अनुसूची भरून घेऊन

आदिवासींच्या विकासात राजकिय नेतृत्व आणि कल्याणकारी व उप- योजनांची अंमलबजावणी कशी केली जाते याची माहिती यामध्ये देण्यात आलेली आहे.

प्रकरणाच्या शेवटच्या भागात महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या विकासाच्या संदर्भात आदिवासी जमाती आणि त्यांच्या नेतृत्वावर ज्या अभ्यासकांनी विशेषत: नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व त्यांच्या नेतृत्वासंबंधी लेखन केलेले आहे. त्यांच्या संशोधन साहित्याचे परिशीलन म्हणून आढावा घेतलेला आहे. त्यामुळे प्रस्तूत संशोधनास दिशा प्राप्त झाली. परिशिलनातून असे स्पष्ट होते की, बहुतांश अभ्यासकांनी सामाजिक, आर्थिक दृष्टीकोनातून आदिवासींच्या विकासाकडे पाहिले आहे. त्यामध्ये डॉ. सुनिल उगले यांनी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकासात बाएफ मित्र या स्वयंसेवी संस्थेचा सहभाग, डॉ. पद्माकर नागजी सहारे यांनी नाशिक जिल्ह्यातील कोकणा जमातीचा सामाजिक सांस्कृतिक अभ्यास, डॉ. मारोती तेगमपुरे यांनी आदिवासी विकास आणि वास्तव, विशेष संदर्भ ; किनवट तालुका याचा अभ्यास केलेला आहे. परंतु त्यामध्ये आदिवासी राजकीय नेतृत्वाची भूमिका याचे अध्ययन झालेले नाही. म्हणून ''नाशिक जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व आणि त्यांच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी'' हा संशोधन विषय पूर्णत: वेगळा आणि स्वतंत्र असा आहे म्हणून हा विषय अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

प्रकरण दुसरे : नाशिक जिल्ह्यातील आदिवासी जमाती आणि त्यांचे राजकीय नेतृत्व

प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासी म्हणजे कोण? महाराष्ट्रातील आणि भारतातील आदिवासींचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला असून नाशिक जिल्ह्यामध्ये राहणाऱ्या आदिवासी जमातींचा सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जसा समाज तसे राजकीय नेतृत्व. आदिवासी समाज डोंगरदऱ्यातून राहणारा आहे. त्यामुळे तो काटक लढवय्या असल्याचे दिसून येते. ब्रिटिश सत्ता आल्यावर ब्रिटिशांच्या विरोधात लढण्याचे नेतृत्व आदिवासी जमातीच्या लोकांनी देशातील इतर भागाबरोबरच नाशिक जिल्ह्यातूनही केलेले आहे. स्वातंत्र्यानंतर आदिवासींना भारतीय राज्यघटनेमध्ये राजकीय आरक्षण देण्यात आलेले आहे. राजकीय नेतृत्व म्हणजे काय? चांगले नेतृत्व कोणते? आदिवासींचे ग्रामपंचायत,पंचायत समिती, जिल्हा परिषदेतील राजकीय नेतृत्व आणि त्यांचे आदिवासींसाठीचे कार्य याचा अभ्यास यात करण्यात आलेला आहे.

प्रकरण तिसरे : आदिवासींसाठीच्या उप-योजना व कल्याणकारी योजना

प्रस्तूत प्रकरणामध्ये आदिवासी समाज इतर समाजाच्या तुलनेत खूपच मागासलेला समाज आहे. त्याच्या उन्नतीसाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय स्थित्यंतरण करुन त्यांना मूळ राष्ट्रीय प्रवाहात सहभागी करुन घेण्यासाठी भारतीय राज्यघटनेच्या 46व्या कलमात तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच आदिवासींच्या एकूण विकासासाठी पाहणी करण्यासाठी व त्यांच्या समस्यांवर उपाययोजना सूचविण्यासाठी खास आयोग नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला आहे.

भारतीय राज्यघटनेतील तरतूदिंना डोळ्यासमोर ठेवून आदिवासींच्या विकासासाठी 1972 पर्यंत समाज कल्याण विभाग कार्यरत होता. 1972 साली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना झाली व पुढे 1973 मध्ये आदिवासी कल्याण विभाग स्वतंत्र करण्यात आला. तसेच 1975-76 साली आदिवासी विकास विभागाची निर्मिती केली गेली. आदिवासी विकास विभागाचे महाराष्ट्रातील विभिन्न आदिवासी विभागात चोवीस एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प स्थापन करण्यात आलेले असून त्यामार्फत आदिवासींच्या विकासासाठी किंवा कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात. तसेच आदिवासींच्या विकासासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना १९९९ मध्ये करण्यात आली असून त्यांची राज्यात बारा प्रादेशिक कार्यालये आहेत. त्यांच्यामार्फत आदिवासींसाठी विविध विकास योजना राबविल्या जातात. तसेच महाराष्ट्र राज्य आदिवासी सहकारी विकास महामंडळ, आणि दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांचे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या मार्फतही आदिवासींच्या विकासाच्या विविध योजना राबविल्या जातात. त्या विविध योजनांचा समावेश या प्रकरणात करण्यात आलेला आहे. या योजनांच्या उद्दिष्टांनुसार त्यांची पूर्णपणे अंमलबजावणी होत नाही. पण काही प्रमाणात विकास होत आहे. मोठ्या प्रमाणात विकास होणे गरजेचे आहे हे या अभ्यासावरुन दिसून येते.

प्रकरण चौथे: नाशिक जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्वाची आदिवासींच्या विकासातील भूमिका

प्रस्तूत प्रकरणामध्ये आदिवासींच्या विकासात राजकीय नेतृत्वाची भूमिका कशी आहे, या संबंधिचा अभ्यास केलेला आहे. ग्रामीण भागाच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्यांचे नेतृत्व महत्त्वाची भूमिका बजावत असते. म्हणून ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या आदिवासींसाठी राखीव असलेल्या मतदार संघातून निवडून आलेल्या इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, सुरगाणा, दिंडोरी, कळवण आणि सटाणा या आदिवासी

बहूल भागातील 56 आदिवासी राजकीय नेतृत्वाकडून मुलाखत अनुसूची भरुन घेण्यात आल्या. त्यातून असे लक्षात येते की, 99.2 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व हे उच्च शिक्षण घेतलेले नाही त्यामुळे त्यांचा राजकारणात प्रभाव पडत नाही. तसेच 87 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्वाला महाराष्ट्रामध्ये आदिवासींच्या किती आणि कोणत्या जमाती आहेत हे माहीत नाही. तसेच त्यांना समाजाबद्दल तळमळ आहे पण सामाजिक संघटन कौशल्य नाही त्यामुळे राजकीय संघटन व प्रश्न सोडवणे शक्य होत नाही.

आदिवासी राजकीय नेतृत्वाला मोठया प्रमाणात शिक्षणाचे महत्त्व कळालेले आहे पण ते आदिवासी समाजाला त्या प्रमाणात जागृत करीत नाहीत. शासनाने शिक्षण खेड्यापाड्यात पोहचविलेले आहे, पण त्याचे महत्त्व आदिवासींच्या लक्षात आलेले नाही. आदिवासींच्या विकासासाठी कोणकोणत्या विभागाकडून आणि महामंडळाकडून आदिवासींसाठी योजना राबविल्या जातात याची माहिती आदिवासी राजकीय नेतृत्वाला नाही. 75 टक्के आदिवासी राजकीय नेते आदिवासींना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत नाही. 42.9 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नाहीत. तसेच कुमारिका मातेला 97.8 टक्के नेते कोणतीही मदत करत नाहीत. यावरुन आदिवासी राजकीय नेतृत्व आदिवासींच्या विकासात फार महत्त्वाची भूमिका बजावत नाही असे दिसून येते.

प्रकरण पाचवे: नाशिक जिल्ह्यातील आदिवासींच्या कल्याणकारी किंवा उपयोजनांची अंमलबजावणी : वास्तव आणि अपेक्षा

प्रस्तूत प्रकरणामध्ये नाशिक जिल्ह्यातील आदिवासींसाठीच्या विकासासाठी प्रशासकीय विभागामार्फत कोणकोणत्या योजना राबविल्या जातात. त्याचा कितपत फायदा आदिवासी नागरीकांना होतो, प्रशासकीय अधिकारी योजना अंमलबजावणीच्या संदर्भात कशी भूमिका घेतात. याचा अंदाज मांडण्यासाठी 2011-12 या एका वर्षाची प्रातिनिधीक स्वरुपात आदिवासी योजना अंमलबजावणीची माहिती संबंधित विभागाकडून घेऊन त्याचे विश्लेषण केलेले आहे. त्याद्वारे असे स्पष्ट होते की, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक या विभागाच्या आदिवासींसाठी काही योजना आहेत परंतु त्यांना आर्थिक तरतूद नाही. ज्या योजनांना आर्थिक तरतूद आहे त्यांची अंमलबजावणी केलेली नाही. काही योजनांचे अनुदान पूर्ण खर्च केलेले नाही असे दिसून येते. यातून प्रशासनाचा हलगर्जीपणा दिसून येतो.

या प्रकरणाच्या दुसऱ्या भागामध्ये आदिवासी नागरीकांसाठीच्या मुलाखत अनुसूचिचे विश्लेषण केलेले आहे. ही अनुसूची 96 आदिवासींसाठी वापरण्यात आली. तिच्या विश्लेषणाद्वारे असे स्पष्ट होते की,

आदिवासींसाठी असलेल्या योजना ह्या 85.4 टक्के लोकांना माहितीच नाहीत. 76 टक्के आदिवासींना योजनांचा लाभ मिळत नाही. 79.7 टक्के आदिवासींचे राजकीय संघटन झालेले नाही. तसेच 81.3 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व जनतेला वेळच देत नाही. 78.1 टक्के आदिवासी राजकीय आदिवासींना वेळच देत नाही. आदिवासी राजकीय नेतृत्व हे परावलंबी, नामधारी आहे.

आदिवासींच्या मते आपला नेता उच्चविद्याविभूषित असला पाहिजे त्याने सक्षमपणे आदिवासींचे नेतृत्व केले पाहिजे. आदिवासींचे प्रश्न तळमळीने सोडविण्याची त्याची तयारी असली पाहिजे. नेतृत्व हे दुबळे, परावलंबी असता कामा नये. आदिवासी नेता मास लिडर असला पाहिजे. आणि आदिवासींवर अन्याय, अत्याचार झाला असता त्याने आदिवासींच्या मदतीला धावून आले पाहिजे. तसेच प्रस्थापित नेत्याच्या हातातील बाहुले बनता कामा नये. अशा आदिवासी जनतेच्या आदिवासी नेत्यांकडून काही अपेक्षा असल्याचे अभ्यासाअंती दिसून येते.

प्रकरण सहावे : निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तूत प्रकरणात वरील सर्व प्रकरणांच्या अभ्यासात प्राप्त झालेल्या सारांशाच्या आधारे महत्त्वपूर्ण निष्कर्ष आणि शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

निष्कर्ष :

१) ज्या सातपुड्यातील भिल्लांनी भारतात येण्यास आर्यांना विरोध केला, इंग्रजांना विरोध केला, तेच भिल्ल मूळ निवासी आजही डोंगर, दऱ्या-खोऱ्यातून, खेड्यापाड्यातून मागास जीवन जगत आहेत. हे संशोधनातून स्पष्ट होते.

२) आजही मुख्यत्वे करुन पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर आणि तुरळक प्रमाणात इगतपुरी, कळवण व सटाणा या आदिवासी भागातील कोकणा, वारली, काथोडी, महादेव कोळी या आणि काही प्रमाणात इतर अनुसूचित जमातीमध्ये पैशाअभावी पेण भरुन (साखरपुडा करुन) वैवाहीक जीवन जगण्यास मान्यता दिली जाते. पुढे पैसे आल्यानंतर किंवा शासनाच्या कन्यादान योजनेचा लाभ घेऊन सामूहीक विवाह सोहळ्यात लग्न केले जाते. त्यांच्या लग्नात त्यांचीच मुले नाचतात. इतके दारिद्र्य आजही आदिवासींमध्ये आहे हे संशोधनातून सिद्ध होते.

३) अनुसूचित जमातीमध्ये दारिद्र्य, बेकारी, अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे कोकणा जमातीमध्ये आजही डोंगऱ्या देवाच्या नवसापोटी कु. गवळी कैलास जनार्दन या टि.वाय.बी.ए. च्या विद्यार्थ्याला महाविद्यालयामध्ये शर्ट घालून पाठवत नाहीत, हे संशोधनाअंती स्पष्ट झाले आहे.

४) अनुसूचित जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात आहेत. गीताबाई गोरख गांगड या तीन मुलाची आई असलेल्या महिलेचा बळी नवस फेडण्यासाठी सिन्नर तालुक्यातील सोनेवाडी (ठाकरवाडी) येथे पती व सासरा यांनी दिला. हे संशोधनातून स्पष्ट झाले.

५) दुसऱ्याचे दु:ख त्यांच्या भूमिकेतून समजून घेण्याची क्षमता आणि व्यवहाराची वस्तूनिष्ठ कारण मिमांसा कोणत्याही राजकीय नेतृत्वाला करता आली तर ते नेतृत्व अधिमान्य होऊन लोकप्रिय होते. आदिवासी राजकीय नेतृत्वाला असे कार्य करुन लोकप्रिय नेता बनता येते पण तसे झाले नाही हे या संशोधनातून स्पष्ट होते.

६) महाराष्ट्रातील अनेक आदिवासी राजकीय नेत्यांनी आपापले मतदारसंघ आणि इतर भागात आपापल्या परीने आदिवासींचा विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आदिवासी समाज आजही मागासलेलाच दिसून येतो. हे या संशोधनातून दिसून येते.

७) माजी खासदार आणि पहिल्या पंचायत समिती पेठचे सभापती सीताराम भोये यांनी पेठ, सुरगाणा येथे एम. आय.डी.सी सुरु करणे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणे, मनमाड, पेठ, बलसाड रेल्वे मार्ग सुरु करणे, नार-पार नद्यांवर मोठे प्रकल्प घेऊन त्या पूर्ववाहिनी प्रवाहित करण्याची मागणी केलेली होती. पण ते प्रश्न आजही सुटलेले नाहीत त्यामुळे या आदिवासी भागाचा विकास झालेला नाही. हे या संशोधनावरून स्पष्ट होते.

८) माजी खासदर आणि दिंडोरी पंचायत समितीचे पहिले उपसभापती हरिभाऊ महाले यांच्या मते आदिवासींनी लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रयोगात भाग घेतला पाहिजे. राजकीय नेतृत्व आणि राजकीय शक्ती प्राप्त झाली, तर सामाजिक चळवळी पुढे नेता येतात.'' या दृष्टिने विचार करता आजच्या काळातील आदिवासी, लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत काही प्रमाणात सहभागी झाला आहे. परंतु त्याला स्वतंत्र राजकीय नेतृत्व आणि राजकीय शक्ती प्राप्त झाली नाही. प्रत्यक्षात ग्रामपंचायत सदस्यापासून ते लोकसभेच्या उमेद्वारापर्यंत आदिवासी राजकीय नेतृत्व परावलंबी आहे. प्रस्थापित राजकीय नेते त्यांना नियंत्रणाखाली ठेवतात. सत्ता ही त्यांच्याकडे नामधारी स्वरुपाची ठेवली जाते. त्यामुळे आदिवासींचा विकास होण्यास अडथळे येतात, हे या संशोधनावरून स्पष्ट होते.

९) दिनांक 21/01/1996 मध्ये मालेगाव लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार कचरु भाऊ राऊत आणि वाहरु सोनवणे यांनी नाशिक येथे एक आदिवासी राजकीय पक्ष आणि नाशिक, ठाणे, धुळे आणि नंदूरबार या जिल्ह्यांचा समावेश असलेले नवीन आदिवासी राज्य निर्मितीची मागणी करण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व

आदिवासी नेत्यांची परिषद नाशिक येथे आयोजित केली होती, त्याला व्यक्तीवादी राजकारणामुळे अपयश आले हे या संशोधनावरून स्पष्ट होते.

१०) गरीब मुला-मुलींचा शिक्षणाचा खर्च देणे, त्यांच्या अडीअडचणीला धावून जाणे, आदिवासी विद्यार्थ्यांना सहानुभूती दाखविणे अशा प्रकारची कामे 92.2 टक्के आदिवासी राजकीय नेते करीत नाहीत. हे या संशोधनातून स्पष्ट होते.

११) माजी जिल्हा परिषद सदस्य जनार्दन सावळीराम भोये यांच्या मते गरजू आदिवासी नागरीकांनाच विविध शासकीय योजनांचा लाभ दिला पाहिजे हे या अभ्यासातून स्पष्ट होते.

१२) स्थानिक स्वराज्य संस्थेतील आदिवासी राजकीय नेतृत्वाच्या मते सुरगाणा तालुक्यात 99 टक्के ग्रुप ग्रामपंचायती असून त्यामुळे या भागातील गावांचा विकास होत नाही, हे या संशोधनावरून स्पष्ट होते.

१३) आदिवासी समाजाला कर्मचारी वर्ग विसरलेला आहे. राजकीय नेतृत्वही प्रस्थापित राजकीय नेत्याच्या दावणीला बांधले आहे. त्यामुळे आदिवासींचा विकास होत नाही, हे या संशोधनातून स्पष्ट होते.

१४) काही स्थानिक स्वराज्य संस्थेतील आदिवासी राजकीय नेते आदिवासी समाजाच्या विकासासाठी वरवरची तळमळ दाखवतात पण प्रत्यक्षात व्यावसायिक व स्वार्थी नेतृत्व असल्याचे दिसून येते, हेही या संशोधनातून दिसून येते.

१५) काही स्थानिक स्वराज्य संस्थेतील आदिवासी राजकीय नेतृत्व करणाऱ्या स्त्रिया पतीच्या सूचनेनुसार आणि पती प्रस्थापित राजकीय पक्षाच्या बीगर आदिवासी राजकीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनानुसार निवडणुका लढवून निवडून येतात आणि होयबाची भूमिका पार पाडतात. ते आपल्या समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करत नाहीत असे या संशोधनातून दिसून येते.

१६) ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्यांच्या कार्याचा आढावा घेतला तर असे दिसून येते की, त्यांना स्वतंत्रपणे निर्णय घेता येत नाहीत. प्रस्थापित राजकीय पक्ष आणि नेतृत्वाच्या दबावाखाली राहून कार्य करावे लागते. त्यात काहींचे स्वत:चे शिक्षण पुरेसे नाही, काहींना राजकीय अनुभव नाही. बहुतेकांची आर्थिक परिस्थिती सक्षम नाही. त्यामुळे त्यांच्याकडून आदिवासींच्या विकासाला पाहिजे त्या प्रमाणात हातभार लागत नाही. हे या संशोधनावरून दिसून येते.

१७) आदिवासी समाज हा इतर समाजाच्या तुलनेत मागासलेला असल्याकारणाने आदिवासींच्या विकासासाठी भारतीय राज्यघटनेत कलम 46 मध्ये अनेक तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर राज्यघटनेच्या कलम 330 व 332 नुसार लोकसभा आणि राज्यविधी मंडळातही अनुसूचित जमातीसाठी आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. तसेच 243 (घ) 1)(ख) नूसार पंचायत राज व्यवस्थेत आदिवासींसाठी आरक्षण

ठेवण्यात आलेले आहे. त्याचा फायदा आदिवासी राजकीय नेतृत्व घेत आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात सत्तेचा वापर करताना आदिवासी राजकीय नेतृत्वाला नामधारी रहावे लागते आहे. हे संशोधनाअंती स्पष्ट होते.

१८) आदिवासी विकास विभागाचे उद्दिष्ट्ये आदिवासी विभागातील आणि इतर विभागातील विकासात्मक दृष्ट्या तयार झालेली दरी किंवा अंतर भरुन काढणे आहे. परंतु हे अंतर किंवा दरी अद्यापपर्यंत भरुन काढलेली नाही, हे या संशोधनातून स्पष्ट होते.

१९) आदिवासी विकास विभागाच्या दुसऱ्या उद्दिष्टानूसार आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक योजना राबविणे यामध्ये प्राथमिकतेने आदिवासींचे प्रत्येक स्तरावरील शोषण थांबविणेबाबत आहे. या संदर्भात योजना अंमलबजावणीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, आदिवासींचे प्रत्येक स्तरावरील शोषण थांबलेले नाही, हे संशोधनाअंती स्पष्ट होते.

२०) आदिवासी विकास विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे आदिवासींच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात्मक कार्यक्रमांना आतापर्यंत पूर्णपणे गती मिळालेली नाही. असे या संशोधनातून स्पष्ट होते.

२१) आदिवासी विकास विभागाचे उद्दिष्ट असेही आहे की, आदिवासी समुहाचे एकीकरण करणे आणि त्या सर्वांचा विकास घडवून आणणे आहे. परंतु अद्याप या प्रक्रियेस आदिवासी विकास विभागाला यश आलेले नाही. हे या संशोधनातून स्पष्ट होते.

२२) इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, सुरगाणा या आदिवासी भागात दळणवळणाच्या सुविधा चांगल्या प्रकारे झालेल्या नाहीत हे या संशोधनावरून स्पष्ट होते.

२३) पर्यटनाच्या दृष्टिकोनातून सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी या निसर्गसंपन्न क्षेत्राकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. हा भाग लोणवळ्या इतकाच महत्त्वपूर्ण आहे. हे या संशोधनातून स्पष्ट होते.

२४) सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, सिन्नर, सटाणा, येवला, दिंडोरी या भागातील आदिवासींना बारमाही रोजगार आपापल्या गावात मिळत नाही म्हणून काही द्राक्ष बागेच्या कामासाठी, काही ऊस तोडीसाठी, काही बिल्डिंग बांधकामासाठी नाशिक, मुंबई, सुरत आणि काही जण मिळेल त्या कामासाठी घर सोडून राहतात. असे संशोधनाअंती दिसून येते.

२५) पोषणासारख्या योजना असल्या तरी नाशिक जिल्ह्यामध्ये सन 2011-12 मध्ये 15845 कुपोषित बालकांची संख्या आढळून आलेली आहे, हे या संशोधनावरून दिसून येते.

२६) आदिवासी जमातीच्या आर्थिक उन्नतीसाठी “शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ” स्थापन करण्यात आले आहे. परंतु या महामंडळालाही अद्यापपर्यंत आपले उद्दिष्ट पूर्ण करता आलेले नाही हे संशोधनाअंती दिसून येते.

२७) नाशिक जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील आदिवासी राजकीय नेतृत्वाचे 98.2 टक्के उच्च शिक्षण झालेले नाही. त्यामुळे त्यांना त्यांच्या प्रश्नांचे राजकारण करता येत नाही आणि आपले प्रश्न, समस्या, चांगल्या प्रकारे सोडवून घेता येत नाहीत.

२८) नाशिक जिल्ह्यातील आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्या दुबळ्या आदिवासी व्यक्तीला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये उभे करुन निवडून आणले जाते. आणि त्याच्या पदाचा वापर आपल्यासाठी उच्चवर्णीय लोक करुन घेतात. ही या जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्वाची अवस्था आहे. हे या संशोधनातून स्पष्ट होते.

२९) नाशिक जिल्ह्यात आदिवासी राजकीय नेत्यांमध्ये घराणेशाही नाही. ती ए. टी. पवारसाहेब, हरीभाऊ महाले, रामदास चारोस्कर यांच्या घराण्यातून काही प्रमाणात वाढीला लागत आहे. परंतु यांच्या घराणेशाहीमुळे आपणास त्रास होऊ नये, म्हणून प्रस्थापित राजकारणी वर्ग आदिवासी राजकीय नेत्यांमध्ये घराणेशाही निर्माण होऊ देत नाही. संबंधित नेत्यांना आलटून पालटून निवडणूक उमेदवारी दिली जाते. हे या संशोधनातून स्पष्ट होते.

३०) चांगल्या राजकीय नेतृत्वाचा पाया म्हणजे चांगले सामाजिक संघटन होय. सामाजिक संघटन हे समाजसेवी वृत्तीतून निर्माण होते आणि त्यातूनच राजकीय नेतृत्वाला पाठबळ मिळत असते, नेतृत्व निर्मिती होते. अनेक निवडणुकीतील विजय म्हणजे यशस्वी राजकीय संघटन होय. अशा प्रकारचं राजकीय संघटन मोठ्या प्रमाणात नाशिक जिल्ह्यातील आदिवासी राजकीय नेतृत्वात दिसत नाही. हे या संशोधनातून स्पष्ट होते.

३१) नाशिक जिल्ह्यातील एकूण आदिवासी राजकीय नेतृत्वाच्या 93.4 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व हे संघटनाहीन आहे. आदिवासींवर अन्याय, अत्याचार झाला असता हे आदिवासी राजकीय नेतृत्व संघटना पातळीवर विरोध करत नाहीत हे संशोधनाद्वारे स्पष्ट होते.

३२) आदिवासींच्या मागण्यांसाठी 21.4 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व मोर्चे काढतात. तसेच भूमिहीन आदिवासींना जमिनी मिळवून देण्यासाठी 16.1 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व प्रयत्न करताना दिसते. थोडक्यात आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय नेतृत्व कमी पडत आहे. असे संशोधनाअंती दिसून येते.

३३) आदिवासी राजकीय नेतृत्व शिक्षणाबद्दल मोठया प्रमाणात जागृत आहे. परंतु यापैकी 82.2 टक्के नेते जनतेला जागृत करण्याचे कार्यच करीत नाहीत. त्यामुळे आदिवासी नेतृत्व मोठ्या प्रमाणात स्वार्थी असल्याचे संशोधनाअंती दिसून येते.

३४) केंद्र सरकार आणि राज्य शासनाच्या शैक्षणिक सुविधा अनेक खेड्यापाड्यापर्यंत पोहचलेल्या आहेत. तसेच आदिवासी भागात प्राथमिक शाळा, आश्रमशाळा, विद्यार्थी वसतिगृहे काढलेली आहेत. पण त्यांच्याकडे जागृत नागरीक आणि आदिवासी राजकीय नेते लक्ष देत नाहीत. हे संशोधनाअंती दिसून येते.

३५) आदिवासी राजकीय नेतृत्व आदिवासी जनतेच्या विकासासाठी जास्त वेळ देत नाहीत. आणि स्वत:ला झोकून देवून कार्यही करत नाहीत, असे संशोधनाअंती दिसून येते.

३६) आदिवासींच्या विकासाबाबत राजकीय नेत्यांमध्ये अज्ञान मोठ्या प्रमाणात आहे, असे संशोधनाअंती दिसून येते.

३७) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक यांच्याकडून आदिवासींसाठी अनेक योजना राबविल्या जातात. त्यासाठी आर्थिक तरतूदही केली जाते. परंतु 2011-12 मध्ये प्रातिनिधीक स्वरुपात अभ्यासासाठी घेतलेल्या योजनांची 31,89,500 रू इतकी रक्कम परत गेल्याचे दिसून येते.

३८) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ यांच्याकडून 2011-12 मध्ये महिला सशक्तीकरण योजना राबविण्यात आली. त्यात फक्त सहाच महिलांना याचा लाभ दिलेला आहे. यावरुन कर्मचारी आपल्या कर्तव्याचे पालन करीत नाहीत हे दिसून येते.

३९) पंचायत समिती इगतपुरी, त्र्यंबकेश्वर यांच्या सन 2011-12 मध्ये काही योजनांवर तरतूदच करण्यात आलेली नाही. तर काही योजनेसाठी आर्थिक तरतूद आहे, पण खर्चच केलेला दिसत नाही. तसेच सुरगाणा पंचायत समितीमध्ये विविध सहा योजनांवर पूर्णपणे पैसाच खर्च केलेला नाही. यावरुन प्रशासकीय अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा दिसून येतो हे संशोधनातून स्पष्ट होते.

४०) आदिवासी नागरीकांच्या मुलाखत अनुसूचीवरुन असे दिसून येते की, 44.8 टक्के आदिवासी अशिक्षित होते. 33.3 टक्के शेतमजूरी करणारे होते. 4.2 टक्के आदिवासी हे वर्ग तीनची नोकरी करणारे होते. त्यांचे शिक्षणाचे प्रमाण प्राथमिक आणि माध्यमिक जास्त होते. यावरुन एकंदरीत आदिवासी समाज गरीब असल्याचे दिसून येते.

४१) आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. शासन आदिवासींसाठी ज्या कल्याणकारी किंवा उपयोजना राबविते त्या योजनांची माहिती 85.4 टक्के आदिवासींना माहीत नाही. हे संशोधनाअंती दिसून येते.

४२) 76 टक्के आदिवासींना योजनांचा लाभच मिळत नाही. त्यामुळे योजना असल्या काय अन नसल्या काय असे बहुसंख्य आदिवासींना वाटते. असे संशोधनातून स्पष्ट होते.

४३) 93.9 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व संघटने अभावी आदिवासींना योजनांच्या माहिती बाबत मेळावे घेऊन माहिती सांगत नाही. हे संशोधनाअंती स्पष्ट होते.

४४) स्थानिक स्वराज्य संस्थेतील 79.2 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व आदिवासींच्या प्रश्नाविषयी स्थानिकच्या सभागृहात प्रश्नच विचारत नाहीत. त्याचबरोबर आदिवासी राजकीय नेतृत्व, अधिकाऱ्यांना योजना अंमलबजावणी संदर्भात सूचनाही देत नाहीत. यावरुन आदिवासी राजकीय नेतृत्व सक्षम नाही असे संशोधनाअंती दिसून येते.

४५) 81.3 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व जनतेला त्यांच्या समस्या समजावून घेण्यासाठी वेळच देत नाही. त्यामुळे लोक त्यांच्याकडे जात नाही. यावरुन आदिवासी राजकीय नेतृत्वात आदिवासी विकासाबाबत फारशी तळमळ दिसून येत नाही. हे संशोधनाअंती स्पष्ट होते.

४६) आदिवासी नागरीकांच्या आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी नेतृत्वाकडून बऱ्याच अपेक्षा आहेत. आदिवासींना आपला नेता उच्च विद्याविभूषित हवा आहे आणि त्याने सक्षमपणे आदिवासींचे नेतृत्व केले पाहिजे. आदिवासींचे प्रश्न तळमळीने सोडविण्याची त्याची तयारी असली पाहिजे. नेतृत्व हे दुबळे, परावलंबी असता कामा नये. आदिवासी नेता म्हणजे मास लिडर असला पाहिजे. आदिवासींवर अन्याय अत्याचार झाला असता त्याने आदिवासींच्या मदतीला धावून आले पाहिजे. तसेच प्रस्थापित राजकीय नेत्यांच्या हातचे बाहुले बनता कामा नये. अशा प्रकारच्या काही अपेक्षा आदिवासी समाजाकडून आदिवासी नेत्यांकडे करण्यात आलेल्या आहेत. या सर्व अपेक्षा खोट्या ठरत आहेत, असे संशोधनाअंती दिसून येते.

४७) ग्रामस्तरावरील ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या सदस्यांची ग्रामविकासात महत्त्वाची भूमिका असते. परंतु नाशिक जिल्ह्यातील आदिवासींच्या दृष्टिने स्थानिक स्वराज्य संस्थेतील 78.1 टक्के आदिवासी राजकीय नेतृत्व हे अकार्यक्षम आहे, असे संशोधनावरून स्पष्ट होते.

४८) नाशिक जिल्हयातील पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, दिंडोरी, कळवण व सटाणा या तालुक्यांचा परिसर व ठिकाण आदिवासी म्हणून ओळखले जाते. परंतु या तालुक्यांच्या ठिकाणांच्या व्यापारपेठा आणि रस्त्यालगतची सर्व दुकाने, हॉटेल्स,लॉज हे सर्व काही 99 टक्के बीगर आदिवासी जनतेची आहेत. आणि त्या शहरांच्या राजकीय सत्तेवर त्यांचाच अंकुश आहे. म्हणजेच बिगर आदिवासी लोक या आदिवासी भागात व्यापारी म्हणून आले आणि व्यापाराबरोबरच राज्यकर्तेही बनले आहेत.

शिफारशी :

1) शैक्षणिक हक्काच्या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी शासनानेच करावी.

2) शासनाने पेठ, सुरगाणा येथे एम. आय.डी.सी सुरू कराव्यात.

3) पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, दिंडोरी, कळवण व सटाणा या आदिवासी भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी शासनाने सोडवावा.

4) केंद्र व राज्य शासनाने मनमाड, पेठ, बलसाड रेल्वे मार्ग सुरु करणे.

5) आदिवासी राजकीय नेतृत्वाने राजकीय पक्षाची स्थापना करुन सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून विचारप्रणालीचा स्वीकार करुन मागासलेल्यांच्या हिताची उद्दिष्टे घेऊन राजकारणात उतरावे व सर्व समाजाचा विकास करावा.

6) ठाणे, नाशिक, धुळे, नंदूरबार आणि डांगचा काही भाग मिळून शासनाने आदिवासी नवीन राज्याची निर्मिती करावी.

7) आदिवासी राजकीय नेतृत्वाने स्वत:ला पूर्णपणे झोकून देवून कार्य करावे.

8) शासनाने इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, दिंडोरी, सुरगाणा, कळवण आणि सटाणा या आदिवासी भागातील गावांना नियमांच्या चौकटीत राहून प्रत्येक गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करणे.

9) आदिवासी समाजाने कोणत्याही निवडणूकीमध्ये मतदानासाठी पैसे किंवा कोणत्याही वस्तू स्वीकारु नयेत. शंभर टक्के मतदान करावे, पैशाचे आमिष दाखवणाऱ्या उमेदवारांना गावबंदी घालावी. आणि निवडणुकीमध्ये उमेदवारांना कार्याच्या आधारावर निवडणुका लढवण्यास भाग पाडावे.

10) आदिवासी विकास विभाग, शबरी वित्त व विकास महामंडळ, राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांनी आपापली उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून आपापल्या योजना काटेकोरपणे राबवाव्यात.

11) ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या आदिवासी सदस्यांनी उच्च शिक्षण घ्यावे, राजकारणात स्वतंत्रपणे निर्णय घ्यावेत. प्रस्थापित राजकीय पक्ष आणि नेतृत्वाच्या दबावाखाली राहून कार्य करु नये. राजकीय आरक्षणाचा फायदा घ्यावा.

12) शासनाने पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी यातील नैसर्गिक भागांना पर्यटन स्थळाचा दर्जा देऊन काही सुविधा निर्माण कराव्यात.

13) नाशिक जिल्ह्यातील आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्या दुबळ्या आदिवासी व्यक्तीला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये उभे करुन निवडून आणले जाते. आणि त्याच्या पदाचा वापर आपल्यासाठी उच्चवर्णीय लोक करुन घेतात. ही उच्चवर्णीयांची नीती आदिवासींनी हाणून पाडावीत.

14) चांगल्या राजकीय नेतृत्वाचा पाया म्हणजे चांगले सामाजिक संघटन होय. सामाजिक संघटन हे समाजसेवी वृत्तीतून निर्माण होते. त्यातूनच राजकीय नेतृत्वाला पाठबळ मिळत असते आणि नेतृत्व निर्मिती होते. अनेक निवडणूकीतील विजय म्हणजे यशस्वी राजकीय संघटन होय. अशा प्रकारचे राजकीय संघटन आदिवासी राजकीय नेतृत्वाने अवगत करावे.

15) आदिवासींवर अन्याय अत्याचार झाला असता त्यांच्या विरोधात आदिवासी राजकीय नेतृत्वाने मोर्चे निदर्शने करत जावीत.

16) आदिवासींच्या विविध मागण्यांसाठी आदिवासी राजकीय नेत्यांनी एकत्र येऊन दबावगट निर्माण करुन आपले प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न करावेत.

17) आदिवासी राजकीय नेतृत्वाने आदिवासींमध्ये शैक्षणिक जागृती करावी.

18) आदिवासी आश्रमशाळा, शासकीय आदिवासी वसतिगृह व्यवस्थित चालतात, की नाही याकडे आदिवासी राजकीय नेतृत्वाने लक्ष देत जावे.

19) पंचायत समिती इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ, दिंडोरी, सुरगाणा, कळवण व सटाणा यांच्या प्रमुखांनी कर्तव्यदक्ष राहून आदिवासींच्या विविध योजनांची अंमलबजावणी पूर्णपणे व्यवस्थित पार पाडण्याचे आदेश आपल्या सहाय्यकांना देवून कामे करुन घेत जावीत.

20) आदिवासी राजकीय नेतृत्वाने आदिवासींना मेळावे घेऊन योजनांविषयी माहिती सांगावी.

21) स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासी राजकीय नेतृत्वाने आदिवासींच्या प्रश्नाविषयी प्रश्न उपस्थित करुन ते सोडविण्याचे प्रयत्न करावेत.

22) आदिवासी राजकीय नेतृत्वाने आदिवासींना त्यांच्या समस्या, प्रश्न यासाठी स्वतंत्र वेळ दिला पाहिजे.

23) आदिवासी राजकीय नेतृत्वाने प्रस्थापित राजकीय नेतृत्वाच्या हातचे बाहुले बनू नये.

24) ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या आदिवासी राजकीय नेतृत्वाने आदर्श नेतृत्व करावे.

25) आदिवासींचे राजकीय सामाजिकरण मोठ्या प्रमाणात झाले पाहिजे आणि हे काम आदिवासी नेते, कर्मचारी व शिक्षीत नागरिकाने करावे.

26) आदिवासी नागरिकांनीही आदिवासी राजकीय नेतृत्व समजून घ्यावे, शासकीय योजना संबंधी अधिकाधिक माहिती जाणून घ्यावी.

संशोधक
प्रल्हाद दत्तात्रय दुधाने

मार्गदर्शक
डॉ. श्रीराम निकम
राज्यशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद